# -: प्रेस नोट :-

## सुप्रसिध्द सिनेकलाकार सलमान खान यास जिवे ठार माण्याची धमकी देवून, ५ कोटी रूपये खंडणीची मागणी करणाऱ्या आरोपीतास गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडुन जेरबंद

| | | |
|---|---|---|
| ०१ | पोलीस ठाणे | वरळी पोलीस ठाणे, मुंबई |
| ०२ | गु.र.क्र व कलम | ५०२/२०२४ कलम ३०८(४), ३५१(३) भारतीय न्याय संहिता २०२३ |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दि. ०७/११/२०२४ रोजी वेळ २१.५२ ते २१.५५ या कालावधीत |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक:- ०८/११/२०२४ रोजी ०८:५४ वा. |
| ०५ | गुन्हयाचे घटनास्थळ | वाहतूक नियंत्रण कक्ष, वरळी, मुंबई. |
| ०६ | अटक आरोपी | **एक आरोपी अटक अंदाजे वय २४ वर्षे** |
| ०७ | आरोपी अटक केल्याचे ठिकाण | मानवी, जि. रायचूर, राज्य कर्नाटक |

दि. ०७/११/२०२४ रोजी २१.५२ ते २१.५५ या कालावधीत मोबाईल क्र. ९५३५३४६४७२ या व्हॉटसॅप क्रमांवरुन वाहतुक नियंत्रण कक्ष, वरळी, मुंबई यांचे हेल्पलाईन व्हॉटसॅप क्रमांक ८४५४९९९९९९ या मोबाईल क्रमांकावर वेगवेगळे संदेश पाठवून Main Sikandar Hoon **(लेखक - सोहेल पाशा )** ज्याने हे गाणे लिहीले आहे त्यास व सलमान खान याचेकडून पाच करोड रुपयांची खंडणी मिळणेसाठी सलमान खान यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

यास्तव फिर्यादी श्रीमती. सुनिता इश्वर कदम, वय ४५ वर्षे (म.पो.ह.क्र.०५००५८, वाहतुक शाखा) यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन वरळी पोलीस ठाणे, गु.र.नं.५०२/२०२४, कलम ३०८(४), ३५१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

- नमुद मो.क्र. ९५३५३४६४७२ चा धारक व वापरकर्ता इसम नामे व्यंकटेश नारायण, याचा कर्नाटक राज्यामध्ये शोध घेवुन त्याचेकडे तपास केला. सदर इसम हा साधा (अॅण्ड्रॉईड व इंन्टरनेट नसलेला) मोबाईल फोन वापर असल्याचे निष्पन्न झाले. सबब त्याचेकडे अधिक तपास करुन त्याचे मोबाईलची पाहाणी केली असता त्याचे मोबाईल मध्ये व्हॉटसॅप अॅप इंन्स्टॉल नसुन त्यास दि.०३/११/२०२४ रोजी व्हॉटसॅप इंन्स्टॉलेशनचा ओटीपी मेसेज आल्याचे निदर्शनास आले.
- नमुद इसमाकडे अधिक तपास केला असता, त्याने सांगितले की, दि.०३/११/२०२४ रोजी तो बाजारात गेला असताना एका अनोळखी इसमाने त्यास विनंती करुन त्याचेकडे कॉल करण्यासाठी मोबाईलची मागणी केली होती. त्यावर व्यंकटेश नारायण याने स्वत:चा मोबाईल फोन कॉल करण्यासाठी त्या अनोळखी इसमास मदत करण्याचे उद्देशाने दिला होता. त्याच दरम्यान मोबाईल मागितलेल्या इसमाने व्यंकटेश नारायण यांच्या मोबाईल क्रमांवरील व्हॉटस् अॅप त्याचे स्वत:चे मोबाईलवर इस्टॉल करुन घेतले असल्याचे तपासात निष्पन्न झाले.
- सबब आरोपी नामे **सोहेल पाशा** S/o **रसुल बाशा** यानेच स्वत: लिहीलेले Main Sikandar Hoon हे गाणे व त्याखाली धमकी व खंडणीचा व्हॉटस अॅप संदेश मुंबई वाहतूक हेल्पलाईन यांचे मोबाईल क्रमांकावर पाठविल्याचे निष्पन्न झाले. यास्तव नमुद आरोपीतास बृहन्मुंबई येथे आणून वरळी पोलीस ठाणे, मुंबई यांचे ताब्यात देण्यात आले.

**'सद्रक्षणाय् खलनिग्रहणाय्'**

**मुंबई पोलीस आपल्या सेवेशी सदैव तत्पर आहेत.**